महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ २२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ २२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्रमांक:-डब्ल्यूईबी-१०२०/सीआर-२६/२०२१/तेवीस दिनांक:-१९ ऑगस्ट, २०२१

**-: प्रसिध्दीपत्रक :-**

विषय - पूर्व परीक्षांचे प्रलंबित निकाल, संबंधित मुख्य परीक्षांचे दिनांक व विविध सामाजिक प्रवर्गाकरीता आरक्षित पदसंख्येबाबत

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत आयोजित खालील पूर्व परीक्षांचे निकाल अद्याप प्रलंबित आहेत:-

| अ.क्र. | जाहिरात क्रमांक | परीक्षेचे नाव |
|---|---|---|
| १ | ०२/२०२० | सहायक मोटार वाहन निरीक्षक पूर्व परीक्षा-२०२० |
| २ | ०६/२०२० | महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी पूर्व परीक्षा-२०२० |
| ३ | १९/२०१९ | राज्यसेवा पूर्व परीक्षा-२०२० |

२. उपरोक्त परीक्षांचे निकाल तयार करण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात असून सदर प्रक्रिया पूर्ण होताच नजीकच्या आठवड्यात निकाल जाहीर करण्यात येतील. तसेच पूर्व परीक्षेचा निकाल प्रसिद्ध झाल्यानंतर मुख्य परीक्षेचे दिनांक निश्चित करण्यात येतील.

३. शासनाच्या संबधित विभागाकडून प्राप्त होणाऱ्या पद संख्या आणि आरक्षणाच्या आधारे आयोगाकडून भरती प्रक्रिया राबविण्यात येते. पदसंख्या आणि आरक्षित जागा हा विषय पूर्णतः शासनाच्या अखत्यारीतील आहे. शासनाच्या प्रचलित धोरणानुसार आयोगास विविध सामाजिक व समांतर आरक्षित पदावरील भरतीसाठी प्राप्त होणाऱ्या पदांच्या मागणीपत्राच्या आधारे भरतीप्रक्रिया राबविण्यात येत असल्यामुळे विविध सामाजिक घटकासाठी आरक्षित जागा निश्चित करण्याची अथवा तपासण्याची बाब आयोगाच्या अधिकार क्षेत्रामध्ये येत नाही.

ठिकाण:- मुंबई

सहसचिव, माहिती तंत्रज्ञान
महाराष्ट्र लोकसेवा आयोग.